# दिव्य जागृतीचा चमत्कार

१ ऑगस्ट, २०२०

आत्मीय वाचकांनो,

साधक या नात्याने आपल्याला कदाचित असा प्रश्न पडू शकतो की, आपल्या अंतरी विद्यमान असलेल्या दिव्यत्वाप्रति आपण कशा प्रकारे जागृत होऊ शकतो? सर्वात सोप्या, तरीही सर्वात गहन शब्दांमध्ये सांगायचे झाल्यास, सिद्धयोगाच्या गुरूंकडून आपल्याला अनुग्रह प्राप्त होतो आणि आपण त्यांच्या शिकवणींवर मननचिंतन करून, त्या शिकवणींना आपल्या जीवनात उतरवून, त्यांचे परिपालन करतो. या ऑगस्ट महिन्यात अत्यंत महत्त्वाचे तीन प्रसंग आहेत ज्यांच्यामुळे संपूर्ण जगातील आपल्यापैकी अनेक लोकांना गुरुमाई चिद्विलासानंद, बाबा मुक्तानंद आणि भगवान नित्यानंद यांच्या कृपेचा आणि शिकवणींचा अनुभव घेता येणे शक्य झाले आहे.

विश्वव्यापी 'ध्यानक्रांती'चा आरंभ कसा होतो? कदाचित तो एकमेव सर्वाधिक महत्त्वाचा क्षण, १५ ऑगस्ट, १९४७ची सकाळ आहे, म्हणजेच ज्या दिवशी बाबा मुक्तानंदांना त्यांचे श्रीगुरू भगवान नित्यानंद यांच्याकडून शक्तिपात दीक्षा प्राप्त झाली. याला बाबांचा 'दिव्य दीक्षा दिवस' असे म्हटले जाते—तो दिवस जेव्हा बाबांना दिव्य शक्तिपात मिळाला. या रूपांतरणकारी घटनेबद्दल बाबा लिहितात : "किती शुभ दिवस होता तो! किती अमृतमय होता!" या मंगलमय प्रसंगाविषयीचा ऑडिओ ऐकण्यासाठी आणि लिखित स्वरूपात आणखी जाणून घेण्यासाठी, मी तुम्हाला आमंत्रित करतो की, तुम्ही सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवरील *Play of Consciousness* [चित्शक्ती विलास] या पृष्ठाला भेट द्यावी.

याच दिवशी आणखी एक अद्भुत घटनादेखील घडली, आणि ती म्हणजे याच १५ ऑगस्ट, १९४७ रोजी इंग्रजांच्या वसाहतवादी राजवटीपासून भारताला स्वातंत्र्य मिळाले. एकाच वेळी या दोन्ही घटना घडणे, हे या गोष्टींचे स्मरण करवून देते की, स्वातंत्र्याची उत्कंठा सर्वांमध्ये असते तसेच सिद्धयोग गुरूंच्या कृपेचे संप्रेषण होण्याच्या परिणामस्वरूप प्राप्त होणारे आत्मिक स्तरावरील स्वातंत्र्य म्हणजेच मोक्ष हे मानवी स्वातंत्र्याचे सर्वोच्च स्वरूप आहे.

म्हणून, सिद्धयोगी १५ ऑगस्टला बाबा मुक्तानंदांचा दिव्य दीक्षा महोत्सव साजरा करतात आणि त्याच्या आधीच्या आठवड्यात म्हणजेच ८ ऑगस्ट रोजी आपण भगवान नित्यानंदांच्या सौर पुण्यतिथीचा स्मरणोत्सव साजरा करतो, याच दिवशी सन् १९६१मध्ये

भगवान नित्यानंदांनी आपल्या भौतिक देहाचा त्याग करून ते ब्रह्मलीन झाले.

भगवान नित्यानंद एक जन्मसिद्ध होते आणि त्यांच्या आध्यात्मिक प्राप्तीमुळे त्यांचा लौकिक भारतभर होता. हा तो समयदेखील आहे जेव्हा भगवान नित्यानंदांनी आपले सर्वश्रेष्ठ शिष्य, बाबा मुक्तानंद यांना सिद्धयोग परंपरेची दीक्षा प्रदान करण्याची समस्त शक्ती व अधिकार प्रदान केले. भगवान नित्यानंदांनी बाबा मुक्तानंदांना ही दिव्य शक्ती सुपुर्द केल्यामुळे बाबांनी हजारो जिज्ञासूंना शक्तिपात दीक्षा प्रदान केली आणि हेच कार्य श्रीगुरुमाई करत आहेत—त्या आपल्याला आत्म्याच्या अनुभवाप्रति जागृत करत आहेत.

आणि हेच आपल्याला त्या तिसऱ्या ऐतिहासिक प्रसंगाकडे घेऊन येते आहे, ज्याचा सन्मान आपण या महिन्यात करणार आहोत. पन्नास वर्षांपूर्वी, सन् १९७०च्या ऑगस्ट महिन्यात प्रथमच सिद्धयोग मार्गाच्या शिकवणींना आणि कृपेला भारताबाहेरील साधकांपर्यंत नेण्यात आले. हे तेव्हा घडले, जेव्हा बाबा मुक्तानंदांनी त्यांच्या श्रीगुरूंकडून प्राप्त झालेल्या अंतर-आज्ञेनुसार, शिकवणी प्रदान करण्यासाठी आपल्या पहिल्या विश्वयात्रेसाठी प्रस्थान केले. ही पहिली विश्वयात्रा बाबांच्या परमोच्च प्रेमाचे आणि करुणेचे प्रकटरूप होते. आपल्या श्रीगुरूंवरील श्रद्धेमुळे आणि गुरुआज्ञेचे पालन करण्याच्या त्यांच्या दृढ निश्चयामुळे बाबांनी जगभरातील लोकांची आंतरिक आध्यात्मिक शक्ती जागृत केली.

यद्यपि मला कधीही सदेह रूपात बाबांचे दर्शन झाले नाही, तरीदेखील मी त्यांच्या पहिल्या विश्वयात्रेच्या लाभार्थींपैकी एक आहे. सन् १९८७मध्ये, माझ्या युवावस्थेत, मी अमेरिकेतील ऑरेगन राज्यात एक शिक्षक होतो. याच दरम्यान मी रेडिओवर एका लेखकाची मुलाखत ऐकली ज्यांनी मानवी क्षमता या विषयावर पुस्तके लिहिली होती. त्या लेखकाने सांगितले की, त्याला भारतातील एका सिद्धगुरूंकडून दीक्षा प्राप्त झाली, जिच्या फलस्वरूप त्याचे जीवन रूपांतरित झाले आहे; स्वतःविषयीच्या आणि जगाविषयीच्या त्याच्या अनुभवात आमूलाग्र परिवर्तन झाले आहे.

त्या व्यक्तीची कथा ऐकून माझे हृदय आनंदाने उचंबळून आले. त्याच्याबाबतीत काहीतरी रहस्यमय घडले होते— आणि मीदेखील बऱ्याच काळापासून स्वतःसाठी असेच काहीतरी शोधत होतो. माझ्यातील अबोल उत्कंठा व्यक्त करण्यासाठी मी ही कविता लिहिली :

एका सुप्रभाती मी,<br>
एका बालकाने,<br>
प्रकाश पाहिला

रंगीत काचेच्या आरपार जाऊन,
खाली प्रवाहित होणारा,

इतक्या उंचावरून की
जणू स्वर्ग अवतरित होऊन
माझ्यात प्रवेशतो आहे.

वर्षानुवर्ष मी त्या प्रकाशाचा
शोध घेत राहिलो
आणि मग
आणि मग
आणि मग

आणि मग. . . रेडिओवरील त्या कार्यक्रमातून ‘सिद्धयोग’ हे नाव मी लिहून घेतले आणि मग याच दुव्याचा वापर करून मी सिद्धयोग ध्यान-केंद्राचा पत्ता शोधून काढला, जे माझ्या घरापासून साधारण तासाभराच्या अंतरावर होते. एका आठवड्याभरातच जिज्ञासा, उत्साह आणि आशा या भावना मनाशी बाळगून मी शहराबाहेरील उपनगरात असलेल्या एका घराच्या ध्यानकक्षामध्ये प्रवेश करत होतो. काही वेळानंतर मी घराच्या वरच्या मजल्यावरील ध्यानकक्षात बसून सत्संगाच्या आरंभीची ‘ज्योत से ज्योत जगाओ’ आरती गात होतो आणि खोलीच्या दर्शनी भागी सजलेल्या पूजेतील गुरुमाई चिद्विलासानंदांच्या फोटोकडे एकटक पाहत होतो. गात असताना, मी गुरुमाईंकडे पाहत होतो; माझ्या अस्तित्वात आनंदाचे, प्रशांतीचे आणि आश्चर्याचे भाव पसरत चालल्याची जाणीव मला होत होती. मला वाटू लागले की, माझ्या अंतरी नवीन काहीतरी खुले होते आहे, असे काहीतरी की ज्याची उपस्थिती अगदी जिवंत होती आणि जिला मी प्रेम आणि निःस्तब्धता म्हणेन. त्या वेळी त्या भावनेचे वर्णन करायला माझ्याकडे शब्द नव्हते, पण आता मला उमगले आहे की, तो आध्यात्मिक जागृतीचा चमत्कार होता, सिद्धयोग गुरूंच्या कृपेने प्राप्त झालेली ती शक्तिपात दीक्षा होती.

त्या दिवशी श्रीगुरुमाईंशी माझी भेट त्यांच्या फोटोच्या माध्यमातून जर झाली नसती, तर माझे आयुष्य कसे असते याची कल्पना करणेदेखील मला अवघड वाटते. इतर हजारो लोकांप्रमाणेच, माझ्या संपूर्ण आयुष्याला श्रीगुरुमाईंच्या शिकवणींनी तसेच सिद्धयोगाच्या अभ्यासांनी प्रेरित केले आहे आणि त्याला आधारही दिला आहे.

आता वर्ष २०२०मध्ये, आधुनिक इतिहासातील या अत्यंत कष्टदायक समयी, मी आणि इतर अगणित लोक सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटचा आश्रय घेऊ शकत आहोत. ही वेबसाइट लेखांचे आणि बोधकथांचे, कवितांचे आणि नामसंकीर्तनांचे अक्षयपात्र आहे; या पात्रातील प्रत्येक सामुग्रीचा उद्देश आहे—भगवंताच्या, श्रीगुरूंच्या आणि आपल्या अंतरात्म्याच्या आपल्या अनुभवाला विकसित करणे. विशेषतः, सध्या आपण 'मंदिरात राहा' या अद्भुत सत्संगांमध्ये सहभागी होऊ शकतो, ज्यांमध्ये आपण भगवान नित्यानंदांच्या मूर्तीसमक्ष नामसंकीर्तन आणि ध्यान करतो. आपण किती भाग्यवान आहोत की, आपण सध्या, अशा या उत्कृष्ट रूपात श्रीगुरुमाईंची कृपा आणि त्यांच्या शिकवणी प्राप्त करू शकत आहोत!

अलीकडेच वेबसाइटवर 'जतन करण्यासाठी आशीर्वाद' ही शक्तिपूर्ण व काव्यात्मक पोस्ट प्रकाशित केली गेली आहे—हे नाव श्रीगुरुमाईंनी त्या उत्कृष्ट व्हिडिओज्‌साठी निवडले आहे, जे व्हिडिओज् 'मंदिरात राहा'च्या बऱ्याचशा सत्संगातील समापनाचा भाग आहेत. 'जतन करण्यासाठी आशीर्वाद,' श्रीगुरुमाईंच्या साधनेविषयी असलेल्या शिकवणी आहेत, त्यांच्या या शिकवणी आपल्याला याविषयी मार्गदर्शन करतात, की एक सिद्धयोगी म्हणून आपण या कठीण परिस्थितीमध्येदेखील सिद्धयोग साधनेचा अभ्यास कशा प्रकारे करू शकतो आणि विश्वकल्याणाचे कार्य पुढे चालू ठेवण्यास कशा प्रकारे हातभार लावू शकतो.

आपल्यातील अनेकांनी अनुभवलेच असेल की, गेल्या अनेक महिन्यांमध्ये 'मंदिरात राहा' या सत्संगांनी आपल्यावर श्रीगुरुमाईंच्या कृपेचा आणि शिकवणींचा वर्षाव केला आहे आणि या सत्संगांमधील गुरुमाईंची प्रवचने सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर 'मंदिरात राहा'च्या पृष्ठांवर उपलब्ध आहेत. आता, या सत्संगांचे इतर असाधारण पैलूदेखील वेबसाइटवर उपलब्ध आहेत. Be in the Temple II [मन्दिर में रहो-२]मध्ये या वैशिष्ट्यपूर्ण सत्संगांची इतर अनेक तत्त्वे समाविष्ट आहेत जसे, सिद्धयोगाचे स्वामीगण आणि इतर सिद्धयोग शिक्षकांची व्याख्याने, सिद्धयोग संगीतकारांनी गायलेली भजने आणि आरत्या; आणि वसंतऋतूचे व्हिडिओज् ज्यांमध्ये पाऊस व सूर्यकिरणे वैपुल्याने मंदिराला अभिषेक करत आहेत. 'श्रीगुरु सारिखा' या अभंगाची राणी डोयॉनची हृदय हेलावणारी प्रस्तुती तुम्ही ऐकावी यासाठी मी तुम्हाला विशेषत्वाने प्रोत्साहित करू इच्छितो. श्रीगुरूंवरील भक्तिभावाच्या विषयावर रचित हा अभंग मला अशा एका अवस्थेमध्ये घेऊन जातो की, जिचे वर्णन करण्यासाठी मी केवळ इतकेच म्हणू शकतो की, हा माझ्यासाठी श्रीगुरुमाईंच्या वर्ष २०२०च्या संदेशाचा अगदी चैतन्यमय आणि उल्लासपूर्ण असा अनुभव आहे : 'आत्मा की प्रशान्ति', Peacefulness of the Self. हा

एक मार्ग आहे ज्याच्याद्वारे मी नववर्ष संदेशाचे अन्वेषण करतो आहे आणि त्याचा अनुभव घेतो आहे.

**ऑडिओ प्रसारणाद्वारे सिद्धयोग ध्यानसत्र, २०२०**

गेल्या तीसहून अधिक वर्षांच्या कालावधीमध्ये मी दररोज किमान एकदा तरी ध्यान केले आहे, आणि तरीदेखील मला असे आढळून आले आहे की, 'ऑडिओ प्रसारणद्वारा ध्यान-सत्र २०२०' मध्ये सिद्धयोग ध्यानशिक्षक जे ध्यान-निर्देश देतात, ते खूपच साहाय्यकारी ठरतात. ते माझ्या मनाला शांत करतात आणि प्रगाढ ध्यानामध्ये प्रवेश करण्यासाठी मला मदत करतात. आणि या प्रगाढ ध्यानामुळे श्रीगुरुमाईंच्या नववर्ष संदेशाच्या माझ्या अध्ययनासाठी व अभ्यासासाठी मला आधार मिळतो. ऑगस्ट महिन्याच्या ध्यानसत्राला श्रीगुरुमाईंनी दिलेले शीर्षक आहे, "Contentment in the Mind, Steadiness in the Heart: *Sukhāsana*." ते शनिवार, २९ ऑगस्टपासून उपलब्ध असेल.

**अन्य उत्सव**

**रक्षाबंधन—३ ऑगस्ट**

रक्षाबंधन या भारतीय सणाचा अर्थ आहे 'संरक्षणाचा बंध', आणि सिद्धयोगींमध्ये हा सण एका अशा स्वरूपात साजरा केला जातो की ज्यामध्ये आपण श्रीगुरू व शिष्य यांच्यातील तसेच मित्रांमधील परस्पर प्रेमाच्या व संरक्षणाच्या बंधनाचा सन्मान करतो. या बंधनाचे प्रतीक आहेत, रंगीबेरंगी धाग्यांपासून बनलेल्या राख्या, ज्या मनगटावर बांधल्या जातात. राख्यांच्या या आदानप्रदानात किती प्रेम निहित असते!

तुम्ही विचार करत असाल की, रक्षाबंधनाच्या या मधुर परंपरेत तुम्हाला भाग कसा घेता येईल जेव्हा तुमचे प्रियजन खूप दूर आहेत—किंवा जेव्हा सामाजिक अंतर राखण्याचे पालन तुम्ही करत आहात. एक मार्ग हा आहे की, तुम्ही Teaching in Honor of Raksha Bandhan [रक्षाबंधनाप्रीत्यर्थ श्रीगुरुमाईंची शिकवण] ही लिंक त्यांना पाठवावी. या लिंकमध्ये दोन्ही गोष्टी अभिव्यक्त केल्या गेल्या आहेत, रक्षाबंधनाविषयी श्रीगुरुमाईंची शिकवण आणि एका सुंदर राखीचे चित्रही.

रक्षाबंधन हा सण भारतीय पंचांगानुसार श्रावण महिन्यातील पौर्णिमेला साजरा केला जातो; या वर्षी हा सण तीन ऑगस्टला साजरा केला जाईल.

**जन्माष्टमी—११ ऑगस्ट**

भगवान विष्णूंचा अवतार, श्रीकृष्णाच्या जन्म-महोत्सवाला जन्माष्टमी म्हणतात. श्रावण महिन्यातील कृष्णपक्षाच्या आठव्या दिवशी [अष्टमीला] हा सण येतो. भारताच्या उत्तर प्रदेशात, जिथे भगवान कृष्णाचा जन्म झाला आणि त्यांनी जिथे बालपण व्यतीत केले असे मानले जाते, त्या ठिकाणी प्रार्थनेने, संकीर्तनाने आणि नृत्याने पूरित अशा या उत्सवात सहभागी होण्यासाठी अनेक तीर्थयात्री येतात. जगात कुठेही जरी असलो, तरी आपल्या घरांमध्ये आपण एक गोष्ट करू शकतो, ती म्हणजे त्या अद्वितीय Golden Tale [अर्थात स्वर्णिम कथा]चा आनंद घेणे जी मुलांनी व युवकांनी श्री मुक्तानंद आश्रमात सन् २०१९मध्ये लघुनाट्याच्या रूपात जन्माष्टमीच्या सन्मानार्थ सादर केली होती. ती कथा होती : "भगवान श्रीकृष्ण आणि राक्षस शिशुपाल यांची कथा."

**गणेशोत्सव—२१ ते ३१ ऑगस्ट [भारतात २२ ऑगस्ट ते १ सप्टेंबर]**

भगवान श्रीगणेश, गजानन, जो नवीन आरंभांचे आणि यशस्वी कार्यांचे दैवत आहे, तो भारतातील अत्यंत प्रिय देवतांपैकी एक आहे. असे म्हटले जाते की, गणेशोत्सव वैदिक काळातील त्या समयाचा सन्मान करतो जेव्हा महर्षि वेदव्यासांनी महाभारताचे कथन केले होते आणि भगवान श्रीगणेशाने ते लिपिबद्ध केले होते. गणेशोत्सव साजरा करण्याचा एक आनंददायी मार्ग आहे, 'मंगलदाता कृपासिंधू' हे नामसंकीर्तन करणे. भगवान श्रीगणेशाच्या सन्मानार्थ या नामसंकीर्तनाची रचना श्रीगुरुमाईंनी केली आहे व त्यांनी ते संगीतबद्धही केले आहे. यामध्ये भगवान गणेशाचा सन्मान विघ्नहर्ता, मंगलदाता [मांगल्याचे प्रदाता] आणि कृपासिंधू [कृपेचा व करुणेचा सागर] या रूपांमध्ये केला गेला आहे.

***

ऑगस्ट महिना सिद्धयोग शिकवणींमध्ये आणि अध्ययनामध्ये निमग्न होण्याचे अनेक मार्ग आपल्याला विपुलतेने उपलब्ध करून देतो—आपल्या साधनेत अधिक खोलवर उतरण्याच्या कितीतरी संधी! कदाचित आपण 'मंदिरात राहा' या सत्संगांचा अनुभवही घेत राहू आणि 'जतन करण्यासाठी आशीर्वाद'मध्ये श्रीगुरुमाईंनी प्रदान केलेल्या शिकवणींवर चिंतनही करत राहू! थोड्याशा अधिक जिज्ञासेसह, आपण सिद्धयोग मार्गाच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या इतर *अनेकानेक* साधनांचेही अन्वेषण करू शकतो, जी साधने आपल्याला एक जागृत जीवन जगण्यासाठी मदत करू शकतात.

अलीकडेच मला याविषयीची एक अद्‌भुत अंतर्दृष्टी मिळाली. एके दिवशी सकाळी ध्यानात मला वाटले की जणू मी माझ्या मनाशी कुस्ती खेळतो आहे— माझ्या अंतरी उद्‌भवणाऱ्या प्रत्येक

विचाराचे मी अवलोकन करत होतो आणि त्याला नाकारत होतो. अचानक, माझ्या लक्षात आले की, मला माझ्या विचारांच्या बाबतीत कोणतीच कारवाई करण्याची काहीच गरज नाही; माझ्या अंतरी एक असा भाग आहे जो मुळातच शांत आहे. आता, प्रत्येक दिवशी सकाळी मी जेव्हा ध्यानाला बसतो, तेव्हा माझ्या मनाला शांत करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी मी माझ्या बोधाला फक्त त्या साध्या, सूक्ष्म स्थानावर घेऊन येतो, जे स्थान पॉल म्हणजेच मी नाही; आणि जे मुळातच तेजोमय मौनाने परिपूर्ण आहे, व्यापक आहे आणि मुक्त आहे. मी हे शिकलो आहे की, मी जेव्हा सौम्यतापूर्वक स्मित करतो आणि माझा श्वास सहजतेने सुरू ठेवत माझ्या हृदयक्षेत्रावर केंद्रण करतो, तेव्हा मी या निकटतम आणि आनंदाने व शांततेने भरलेल्या व्यापक ऊर्जेप्रति जागरूक होतो. आणि मग, संपूर्ण दिवसभर मला जेव्हा शांतपणे स्मित करण्याचे आणि मुक्तपणे श्वासोच्छ्वास घेण्याचे स्मरण होते, तेव्हा मी त्या जागृत वास्तविकतेच्या अनुभवाकडे पुन्हा एकदा परतू शकतो; तीच जागृत वास्तविकता जी मी खरोखर आहे.

आपले लक्ष 'स्वतः'कडे वळवण्याचा प्रयत्न करून पाहा. जसजसे तुम्ही हा प्रयत्न दररोज करत जाल, तसतसे तुम्ही कदाचित स्वतःचाच असा मार्ग शोधून काढाल ज्यायोगे तुम्ही स्वतःचे लक्ष अधिकाधिकपणे, इतर गोष्टींवरून वळवून पुन्हा 'स्वतः'वर आणू शकाल; त्या 'स्वतः'वर जो आधीपासूनच जागृत आहे! शेवटी, तुम्ही खरोखर *आत्माच आहात*—त्याचा आनंद घ्या!

आदरपूर्वक,
पॉल हॉकवुड

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.